# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

(विद्या विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : academic.gug@gmail.com /academic.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./विद्या/ 1996 /२०२६ दिनांक:- ३० / ०९ /२०२६

## अधिसुचना

**विषय :- शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता प्रवेश मुदत वाढीबाबत.**

**संदर्भ :** १) अधिसुचना क्रमांक गोंविग/विद्या/१९१७/२०२६, दि. १४/०८/२०२६.
२) अधिसुचना क्रमांक गोंवि/विद्या/१९५९/२०२६, दि. ०९/०९/२०२६.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये तथा सर्व संबंधितांना कळविण्यात येते कि, विद्यापीठाव्दारे निर्गमित करण्यात आलेली संदर्भीय अधिसुचना गों.वि./विद्या/१९१७/२०२६, दिनांक १४/०८/२०२६ नुसार विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयात सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची मुदत वाढवून अंतिम दिनांक ०५/०९/२०२६ पर्यंत देण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक २ अन्वये, अनेक विद्यार्थी विहीत तारखेपर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकले नाही व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासुन वंचित राहु नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. विद्यापरीषदेच्या वतीने दिनांक २१/०९/२०२६ पर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेण्यास मुदतवाढ देण्यात आली होती.

परंतु बरेच विद्यार्थी अद्याप प्रवेश घेवू शकले नसल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासुन वंचित राहु नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. विद्यापरीषदेच्या वतीने **दिनांक ०२/१०/२०२६** पर्यंत महाविद्यालयात **प्रवेश घेण्यास मुदतवाढ** देण्यात येत आहे. **यानंतर कोणत्याही परीस्थितीत प्रवेश घेण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

सदर मुदतवाढ ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीव्दारे केले जातात त्यांना लागु राहणार नाही. निर्धारीत प्रवेश क्षमतेमध्ये रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी हि मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश या अधिसुचनेनुसार झाला असेल त्या विद्यार्थ्यांचा ९० दिवसांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्याबाबत महाविद्यालयांमार्फत प्राचार्यांचे हमीपत्र परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे जमा करणे अनिवार्य असेल, या अटीवर मुदतवाढ देण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये,

(डॉ. अनिल के. हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.
४. पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner